**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र. मा.को.अ‍ॅक्ट/रिव्हीजन/११४/२०२३
दिनांक – ३१.०१.२०२५

**प्रति,**

१. पांडूरंग विठठल शिंदे
२. विठठल पांडूरंग शिंदे
दोघे रा.अचकनहळळी ता.जत जि.सांगली ---------**रिव्हीजन अर्जदार**

**विरूध्द**

१. तहसिलदार जत ता.जत जि.सांगली
२. अंकुश विठठल शिंदे
३. बापु विठठल शिंदे
४. शहाजी विठठल शिंदे
५. दत्तात्रय सुखेदव साळुंखे
६. रामा सुखदेव साळुंखे
७. पांडूरंग सुखदेव साळुंखे
८. प्रकाश जगन्नाथ शिंदे
९. अशोक ज्ञानोबा शिंदे
१०. बंडू आप्पासाहेब सांवत
११. प्रमोद विठठल सावंत
१२. बाळू आनंदा साबळे
१३. हणमंत बाबुराव शिंदे
१४. कुंडलिक बापू साळुंखे

सर्व रा.अचकनहळळी ता.जत जि.सांगली ----------- **जाबदार**

**मामलेतदार कोर्ट अ‍ॅक्ट-१९०६ चे कलम १६(१) प्रमाणे**

**निकालपत्र**

**तहसिलदार जत यांनी मामलेदार कोर्ट अ‍ॅक्ट-१९०६ चे कलम ५ अन्वये क्र.जमिन/मामलेदार कोर्ट अ‍ॅक्ट ०५/एसआर/०२/२०२१, दिनांक २६.०५.२०२३, प्रकरणी दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन, प्रस्तुत रिव्हीजन अर्जदार यांनी या न्यायालयात सदरचा रिव्हीजन अर्ज दाखल केलेला आहे.**

**रिव्हीजन अर्जाचेकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रीतसर नोटीसादेऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**रिव्हीजन अर्जदार यांनी प्रस्तुत रिव्हीजन अर्ज दाखल केलेला रिव्हीजन अर्ज,प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

प्रकरणी रिव्हीजन अर्जदार यांना प्रस्तूत अपिलकामी नोटीस बजाऊन दि. १७.०१.२०२४, २०.०२.२०२४, १९.०३.२०२४, १६.०६.२०२४, २५.०७.२०२४, १३.०८.२०२४, १५.१०.२०२४, ०३.१२.२०२४, ०७.०१.२०२५ अन्वये म्हणणे मांडणेकामी वारंवार संधी देणेत आली आहे. पैकी दि. १७.०१.२०२४, २०.०२.२०२४, , १६.०६.२०२४, २५.०७.२०२४, ०३.१२.२०२४, ०७.०१.२०२५ या तारखांना रिव्हीजन अर्जदार / विधीज्ञ गैरहजर राहिलेले आहेत. तसेच प्रकरणी रिव्हीजन अर्जदार व त्यांचे विधीज्ञ यांना www.eqjcourts.gov.in या संगणक प्रणाली दवारे सुनावणी बाबत एस. एम. एस व विधीज्ञ यांना whatsapp द्वारे सुनावणी कामी कळवून देखिल उक्त सुनावणी दिनांकास हजर रहिले नाहीत. रिव्हीजन अर्जदार यांना नोटीस बजावणीकामी आदेशीत करूनही त्यांनी नोटीस बजावणीकामी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत रिव्हीजन अर्ज चालविणे कामी रिव्हीजन अर्जदार हे काही एक प्रयत्न करीत नसलेचे दिसून येत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे रिव्हीजन अर्ज, हा रिव्हीजन अर्जदार यांना चालविणेचे स्वारस्य दिसून येत

नसल्यामुळे मामलेतदार कोर्ट ॲक्ट-१९०६ चे कलम १६(१) प्रमाणे प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकणे आवश्यक असलेचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रकरणी रिव्हीजन अर्जदार यांना प्रस्तुत रिव्हीजन अर्ज चालविणेत स्वारस्य दिसून येत नसल्याने प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.**

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण — जत
दिनांक — ३१.०१.२०२५

**प्रत— तहसिलदार,जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**